नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
नविन प्रशासकीय इमारत01-पुणे ,कॉन्सील हॉल समोर ,तळमजला ,पुणे-1
फोन-020-26124012, फॅक्स-020-26129949 इमेल- desk9est@gmail.com

क्र.का.9/र व का/उपाययोजना/2020/ 780/2020 दि.9 /06/2020.

**विषय- कार्यालयातील कामकाज करताना कोरोना विषाणू प्रतिबंधासाठी करावयाच्या उपाययोजनाबाबत.**

**संदर्भ - १)या कार्यालयाचे परिपत्रक का.9/उपाययोजना /2020 दिनांक 19/04/2020.**
**२) या कार्यालयाचे परिपत्रक का.4/उपाययोजना /2020 दिनांक 19/05/2020.**

**परिपत्रक:**

दुय्यम निबंधक कार्यालयातील कामकाज करताना कोरोना विषाणू प्रतिबंधासाठी करावयाच्या उपाययोजनाबाबत सविस्तर सूचना संदर्भित परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या होत्या, सदरच्या सूचना तत्कालीन परिस्थितीनुरूप देण्यात आलेल्या होत्या.

या परिपत्रकाच्या मुद्दा क्र. ३.२ नुसार नोटीस ऑफ इन्टिमेशनचे फिजिकल फायलिंग दि.१० जून पासून ऑगस्ट २०२० अखेरपर्यंत थांबवण्यात आले आहे . सह जिल्हा निबंधक यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व बँकाच्या (किमान त्यांच्या जिल्हा मुख्यालयाला) या बाबत तातडीने कळवावे व ई - फायलिंग सुविधा दि. १० जून पूर्वी उपलब्ध करून घेण्याच्या सूचना द्याव्यात असेहा उक्त परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते.

या संदर्भात बऱ्याच बँकांनी ई - फायलिंग सुविधा उपलब्ध करून घेतली असून त्यांना यूजर आयडी देण्यात आले आहेत, त्यांचे कडुन अधिनस्थ शाखांना यूजर आयडी देण्याची व आवश्यक सूचना देण्याची कार्यवाही त्यांचे स्तरावर सुरु आहे, त्यास काही कालावधी लागणार आहे सबब फिजिकल फायलींगचे कामकाज अजून काही दिवस सुरु ठेवावे अशी विनंती काही बँकांनी केली आहे. तसेच कर्जदारास नोटीस ऑफ इन्टिमेशनचे ऑनलाईन फायलींग स्वतः (बँकेच्या सहभागाशिवाय) करता येईल अशी सुविधा विकसित करण्यात येत असून ती अंतिम टप्प्यात आहे.

या बाबीचा विचार करून बँका आणि त्यांचे कर्जदार यांचे हितास्तव , संदर्भित परिपत्रकाचे मुद्दा क्र. ३.२ मध्ये पुढील प्रमाणे बदल करण्यात येत आहे. :

Scanned with CamScan

**३.२:** नोटीस ऑफ इन्टिमेशनचे फिजिकल फायलिंग दि.३० जून पासून ऑगस्ट २०२० अखेरपर्यंत थांबवण्यात येत आहे. यासाठी नागरिकांना ई-फायलिंगचा पर्याय उपलब्ध आहे. सह जिल्हा निबंधक यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व बँकाच्या (किमान त्यांच्या जिल्हा मुख्यालयाला) या बाबत तातडीने कळवावे व ई - फायलिंग सुविधा दि. ३० जून २०२० पूर्वी उपलब्ध करून घेऊन सर्व संबंधित शाखांना यूजर आयडी व आवश्यक सूचना/प्रशिक्षण देण्याबाबत सूचना द्यावयात.

याच अनुषंगाने या कार्यालयाचे परिपत्रक क्र. का.५ /स्पष्टीकरण/प्र.क्र.६/२०/१४६/२० दि २७/४/२०२० मधील मुद्दा क्र. ४ मधील दि. १० जून २०२० ही मुदत दि. ३० जून २०२० अशी सुधारित करण्यात येत आहे .

**(ओमप्रकाश देशमुख)**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रति,

१. अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई

२. सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक

३. सर्व सह जिल्हा निबंधक/ मुद्रांक जिल्हाधिकारी

४. सर्व दुय्यम निबंधक/ विवाह अधिकारी ( सह जिल्हा निबंधक यांचे मार्फत )

५. सर्व कार्यसन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय.

प्रत: मा. अपर मुख्य सचिव, महसूल, मुद्रांक व नोंदणी,मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

Scanned with CamScanner